ZEAL EDUCATION SOCIETY'S

# ZEAL POLYTECHNIC, PUNE

| Doc. No.: ZEAL/POLY/ADMIN/SOP-22/F-20 | Rev. No.: **00** | Rev. Date:**01.09.2023** |
|---|---|---|

Ref. No.: ZP/2024-25/664    Date: 23/06/2025

## Notice / Circular

**Department: Administration**    **Academic Year:** 2025 - 2026    **Date:23/06/2025**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेश (Admission) घेणेबाबत...**

नवीन शैक्षणिक वर्ष **२०२५–२६ दि.** ०१.०७.२०२४ पासून सुरू होत असून द्वितीय वर्षात (प्रथम वर्षातून द्वितीय वर्षात प्रवेश घेणारे) व तृतीय वर्षात ( द्वितीय वर्षातून तृतीय वर्षात प्रवेश घेणारे) तसेच मागील वर्षी नापास झालेले, परंतु नवीन वर्षात प्रवेश घेण्यासाठी पात्र असणाऱ्या सर्व शाखांमधील (Automation & Robotics, Artificial Intellegience & Machine Learning, Civil, Computer, E & TC, Electrical & Mechanical Engineering) विद्यार्थ्यांना कळविण्यात येते कि, नवीन शैक्षणिक वर्ष **२०२५–२६** मधील आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी **दि.२४.०६.२०२५ ते ३०.०६.२०२५** पर्यंत झील तंत्रनिकेतनच्या कार्यालयामधून द्वितीय / तृतीय वर्षाचा **Admission Form** घेऊन, तो परिपुर्ण भरून, त्या सोबत खाली नमुद केलेली कागदपत्रे जोडून व आपणांस आपल्या प्रवर्गाप्रमाणे लागू असणारी कॉलेजची **संपुर्ण फि** भरून (स्कॉलरशिप व छत्रपती राजर्षी शाहू महाराज प्रतिपुर्ती योजना (ईबीसी) यांच्याकडून येणारी प्रतिपुर्तीची रक्कम वगळून) महाविद्यालयामध्ये येऊन प्रवेश निश्चीत करावे.

**Admission Form** भरल्याशिवाय विद्यार्थ्याला **Roll No.** दिला जाणार नाही, तसेच जे विद्यार्थी दिलेल्या कालावधीत प्रवेश निश्चित करणार नाहीत त्या विद्यार्थ्यांचे प्रवेश ग्राह्य धरले जाणार नाहीत, याची नोंद सर्व विद्यार्थ्यांनी व पालकांनी घ्यावी. याबाबत कोणती शंका असल्यास आपल्या विभागाच्या विभागप्रमुख (HoD) यांना भेटावे.

**Admission Form सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.**

**१) डिप्लोमा मार्कशीट झेरॉक्स प्रत (Winter 2024 & Summer 2025), २) नवीन उत्पनाचा दाखला (वैधता ३१ मार्च २०२६) ३) डोमासाईल सर्टिफिकेट झेरॉक्स प्रत ४) कॉलेज फि भरलेली पावतीची झेरॉक्स प्रत (चालू वर्षाची २०२५–२६)**

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी शिष्यवृत्तीचा अर्ज भरण्याकरीता वरील कागदपत्रांची आवश्यकता असून द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना पुन्हा नव्याने महाडिबीटी पोर्टल वरती रजिस्ट्रेशन करण्याची आवश्यकता नसून त्यांनी जुने आयडी व पासवर्ड वापरून स्कॉलरशीप व फ्रिशीप अर्जाचे नुतनीकरण करावयाचे आहे.

स्कॉलरशीप व फ्रिशीप अर्जाचे नुतनीकरण करण्यासाठी वर नमुद केलेल्या कागदपत्रांची आवश्यकता आहे. सदर प्रक्रिया पुर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार असणार नाही, याची नोंद सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावी.

**विद्यार्थ्यांनी झील तंत्रनिकेतनच्या कार्यालयातून ॲडमिशन फॉर्म घेतल्यानंतर खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.**

१) विद्यार्थ्यांनी ऑफिसमधून ॲडमिशन फॉर्म घ्यावा व ॲडमिशन फॉर्म वाचून परीपुर्ण भरावा.
२) ॲडमिशन फॉर्मसोबत डिप्लोमा मार्कशीट झेरॉक्स प्रत, नवीन उत्पन्नाचा दाखला **(वैधता ३१ मार्च २०२६)**, कॉलेज फि भरलेली पावतीची झेरॉक्स प्रत, डोमासाईल सर्टिफिकेट झेरॉक्स प्रत हि कागदपत्रे जोडावीत.
३) ॲडमिशन फॉर्म भरल्यानंतर **Account** विभागात आपणांस लागू असणारी फी भरावी.
४) ॲडमिशन फॉर्म सोबत वर नमुद केलेली कागदपत्रे जोडून ऑफिसमध्ये विद्यार्थी विभागात जमा करावा.

झील पॉलिटेक्निक, नऱ्हे, पुणे-41.

Principal
PRINCIPAL
ZES's Zeal Polytechnic
Narhe, Pune - 411 041.